# रेशीम उद्योग

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

रेशीम उद्योग हा कृषि व वन संपत्तीवर आधारीत उद्योग असुन यामध्ये रोजगाराची मोठी क्षमता आहे. प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या क्षेत्रामध्ये या उद्योगास पोषक वातावरण असल्याने रेशीम उत्पादन करण्यास भरपूर वाव आहे. कृषि विकास दरवृद्धी बरोबरच ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावण्यास मदत करणारा हा उद्योग आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून रेशीम उद्योगास प्रोत्साहन देण्यात येत असूनही राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात या उद्योगाकडे वळलेले दिसून येत नाहीत. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसार करणेसाठी या घटकाचा समावेश नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे:**

१. रेशीम उद्योगाच्या माध्यमातून प्रकल्पांतर्गत समाविष्ट गावसमूहातील शेतक-यांना शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण करून उत्पन्नात वाढ करणे.
२. रेशीम उद्योगाचा समुह आधारीत सर्वांगीण विकास करणे.
३. तुती उत्पादन व रेशीम उद्योगात महिलांचा सहभाग वाढविणे.
४. नाविन्यपूर्ण रेशीम तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचवणे.
५. रेशीम योजनेची फलश्रुती व यशस्वीता याबाबत व्यापक प्रसिद्धी देवून शेतकऱ्यांना या उद्योगासाठी प्रोत्साहित करणे.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. इच्छुक लाभार्थ्याकडे मध्यम ते भारी व पाण्याचा निचरा होणारी जमीन असावी.
२. लागवड केलेल्या तुती क्षेत्रासाठी सिंचनाची पुरेशी सोय उपलब्ध असणे आवश्यक आहे.
३. रेशीम उद्योगासाठी कुटुंबामध्ये किमान एक व्यक्ती तुती लागवड व संगोपनासाठी उपलब्ध असलेले अत्यल्प व अल्प भूधारक शेतकरी, अनु. जाती/अनु. जमाती/महिला/दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने घटकासाठी पात्र आहेत.

**अर्थसहाय्य:**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत रेशीम उद्योग या घटकासाठी दिलेल्या मापदंडानुसार सामान्य प्रवर्गातील लाभार्थींना ७५% व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती करिता ९०% अर्थसहाय्य देय आहे.

| अ. क्र. | तपशील | एकक | मंजूर मापदंडानुसार खर्च (UNIT COST) | प्रकल्प अर्थ सहाय्याचे प्रमाण (मंजूर मापदंडानुसार) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वसाधारण (७५ %) | अ.जाती / अ. जमाती (९०%) |
| १. | तुती रोपे तयार करण्यासाठी आर्थिक सहाय्य | प्रति एकर | १,५०,०००/- | १,१२,५००/- | १,३५,०००/- |
| २. | तुती लागवड विकास कार्यक्रमांकरिता सहाय्य | प्रति एकर | ५०,०००/- | ३७,५००/- | ४५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | दर्जेदार कोष उत्पादनासाठी - किटकसंगोपन साहित्य/ शेती अवजारे साहित्य पुरवठा सहाय्य आधुनिक मांउटेज (Rotary Mountages( सहित | प्रति लाभार्थी | ७५,०००/- | ५६,२५०/- | ६७,५००/- |
| ४. | किटकसंगोपन गृह बांधणी साठी सहाय्य प्रती लाभार्थी | मॉडेल I (१००० चौ. फूट) | १,६८,६३९/- | १,२६,४७९/- | १,५१,७७५/- |
| | | मॉडेल II (६०० चौ. फूट) | ९५,१९७/- | ७१,३९७/- | ८५,६७७/- |

**संदर्भ :-** १. केंद्र शासनाची सिल्क समग्र कार्यान्वयन मार्गदर्शक सूचना २०१७-२०२०; नं. सीएसबी. ३७ / २ / ईएफसी /सीएसएस /२०१७-२०/सी एस एस दिनांक १९/०७/२०१८.

२. सिल्क समग्र Integrated Scheme For Development Of Sericulture Industry (ISDSI) योजना सन २०१८-२०; जाहिरात/रेशीम संचालनालय, नागपूर/वेबसाईट-www.mahasilk.maharashtra.gov.in

यांव्यतिरिक्त बाल्य किटकांच्या बागेची देखभालीसाठी मदत करणे, बाल किटकसंगोपन साहित्य उपलब्ध करणेसाठी मदत करणे (Chawki Rearing Centre), मल्टीएंड रिलिंग मशिन (१० बेसिन) उभारणी, ॲटोमॅटिक रिलिंग मशिन (ARM) २०० एन्डस, रेशीम धाग्याला पीळ देणारे यंत्र (४८० एन्डस) उभारणी, मास्टर रिलर्स आणि तंत्रज्ञ यांची सेवा पुरविणे इ. घटकांचा शेतकरी उत्पादक कंपनी/गटांना लाभ देता येईल.

तुती लागवड, इतर साहित्य याबाबतचे तांत्रिक व आर्थिक मापदंड रेशीम संचालनालयाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे असून त्यामध्ये झालेले बदल प्रकल्पासाठी लागू राहतील.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या**

**लाभार्थी**

१. इच्छुक लाभार्थीने घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून अर्ज करावा व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.
२. पूर्वसंमती मिळाल्यापासून तुती लागवड, प्रकल्प उभारणी पूर्ण करून ६० दिवसात ऑनलाईन अनुदान मागणी करावी.
३. निवडलेल्या लाभार्थीने ग्राम स्तरावर गठीत खरेदी समितीच्या उपस्थितीत रेशीम उद्योगासाठी आवश्यक साहित्याची खरेदी करावी.
४. रेशीम उद्योग या घटकांतर्गत अनुदान मिळणेसाठी ऑनलाईन मागणी करावी. सोबत खरेदी देयकांच्या मूळप्रती व खरेदी समितीचे प्रमाणपत्र लाभार्थ्याने स्व:साक्षांकीत करुन ऑनलाईन अपलोड कराव्यात.
५. लाभार्थ्याने सदर व्यवसाय किमान ३ वर्षे करणे आवश्यक आहे.

**ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC)**

१. सर्व इच्छुक लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छानणी समूह सहाय्यक यांचे मदतीने करून अर्जाच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
२. रेशीम उद्योग साहित्य खरेदी समिती नियुक्त करून तिच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
३. सामाजिक लेखापरीक्षण करणे.

**रेशीम उद्योगासाठी आवश्यक साहित्य खरेदी समिती :-**

१. सरपंच - अध्यक्ष
२. उपसरपंच - सदस्य

३. ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) सदस्यांपैकी एक महिला सदस्य - सदस्य
४. कृषि मित्र/कृषि ताई - सदस्य
५. रेशीम संचालनालयाचा तालुका स्तरावरील प्रतिनिधी
६. कृषि सहाय्यक - सचिव
(अनुक्रमांक १, २, ३ पैकी किमान १ सदस्य, कृषि मित्र/कृषि ताई, रेशीम संचालनालयाचा तालुका स्तरावरील प्रतिनिधी, कृषि सहाय्यक व लाभार्थी यांची खरेदीच्या वेळी उपस्थिती अनिवार्य)

**खरेदी समितीच्या कार्य व जबाबदाऱ्या :**

१. खरेदी समितीने रेशीम उद्योग साहित्य खरेदी कोठून व कोणत्या प्रकारे/ पद्धतीने करावयाची आहे याबाबत निर्णय उपविभागीय कृषि अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार घ्यावा.
२. गावातील निवडलेल्या सर्व लाभार्थ्यांची रेशीम उद्योग साहित्य खरेदी शक्यतो एकाचवेळी करावी.
३. लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष रेशीम उद्योग साहित्य खरेदी केली असल्याबाबतचे प्रमाणपत्र रेशीम उद्योग साहित्य खरेदी समितीच्या सचिवांनी सादर करावे.

**समूह सहाय्यक**

१. इच्छुक लाभार्थी यांना ऑनलाईन अर्ज व प्रकल्पाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
२. लाभार्थ्यांनी ऑनलाईन अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी लाभार्थी निकषानुसार करावी.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि संजीवनी समिती समोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.
४. लाभार्थ्यांस रेशीम उद्योग या घटकाच्या अटी, शर्ती व अंमलबजावणी बाबत समजावून सांगावे.
५. संबंधित कृषि सहाय्यक यांना तुती लागवड, रेशीम उद्योग साहित्य खरेदी व खरेदी पश्चात अंतिम तपासणीसाठी मदत करणे.
६. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**कृषि सहाय्यक**

१. लाभार्थीने ऑनलाईन अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या छाननी आधारे पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करुन तपासणी सूचीनुसार प्रकल्प स्थळ रेशीम लागवडीसाठी/उद्योगासाठी योग्य आहे किंवा नाही, याबाबतचा स्थळ पाहणी अहवाल ऑनलाईन अपलोड करावा व व प्रकल्पाच्या DBT App द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे. यापूर्वी याच घटकासाठी इतर शासकीय योजनेतून लाभ घेतला आहे काय, याबाबत खात्री करावी.
३. तुती लागवडीबाबतचे अंदाजपत्रक रेशीम संचालनालयाच्या मापदंड व मार्गदर्शक सुचनेनुसार तयार करणे.
४. तुती लागवडीनंतर मापन पुस्तिकेत नोंदी घेणे.
५. खरेदी करण्यात आलेले रेशीम उद्योग साहित्य मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे घटकनिहाय योग्य असल्याबाबत व खरेदी प्रक्रिया योग्य असलेबाबत मोका तपासणी अहवाल संकेतस्थळावर अनुदानाच्या शिफारशीसह उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा. तसेच प्रकल्पाच्या DBT App द्वारे नैऋत्य कोपरा स्थळाचे अक्षांश/रेखांशसह भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
६. अनुदान मागणीसाठी देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे.

**कृषि पर्यवेक्षक**

कृषि सहाय्यक यांनी ऑनलाईन अवगत केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी यादृच्छिक (RANDOM) पद्धतीने २५% लाभार्थ्याची अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करावी व याबाबतच्या नोंदी व मापनपुस्तिकेची खात्री करून प्रमाणित कराव्यात. अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून देय अनुदान अदायगीसाठी योग्य असलेबाबत खात्री करून पर्यवेक्षकीय अहवाल सादर करावा.

**उपविभाग स्तर (लेखाधिकारी)**

अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

**उपविभागीय कृषि अधिकारी**

१. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) मान्यतेने प्राप्त झालेल्या लाभार्थीच्या कागदपत्रांची छाननी नंतर पात्र/ अपात्रते बाबत निर्णय घेऊन संबंधित लाभार्थ्यांना ऑनलाईन पूर्वसंमती प्रदान करावी. लाभार्थी अपात्र असल्यास कारणे नमूद करावीत.
२. प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या रेशीम उद्योग लाभार्थ्यांच्या मागणीनुसार तुती लागवडीकरिता आवश्यक रोपांचा पुरवठा करण्याचे नियोजन व कार्यवाही करावी.
३. ऑनलाईन अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प सहाय्यक (कृषि पर्यवेक्षक) उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून देय अनुदान अदायगीसाठी योग्य असलेबाबत खात्री करावी.
४. तपासणी अहवालासह ऑनलाईन शिफारस झालेल्या पात्र प्रस्तावांची देय अनुदान अदायगी प्रस्ताव प्राप्त झालेनंतर DBT द्वारे थेट लाभार्थ्यांना आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करण्यास मंजुरी द्यावी.
५. कृषि सहाय्यक यांनी अवगत केल्यानंतर यादृच्छिक (Random) पद्धतीने ५% लाभार्थ्यांची अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करावी.
६. निवडलेल्या लाभार्थ्यांसाठी रेशीम उद्योग संचालनालयातील अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर घटकाचे प्रशिक्षण आयोजित करावे. तसेच शेतकऱ्यांचे लागवडपूर्व व लागवडीनंतर रेशीम किडी संगोपनाचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. हे प्रशिक्षण जुन्या शेतकऱ्याच्या शेतावर, कृषि विज्ञान केंद्र अथवा पंजीकृत व अधिकृत रेशीम संचालनालयाची मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्था अथवा शेतीशाळा, कृषि विद्यापीठ यांचेकडे उपविभागीय कृषि अधिकारी यांनी आयोजित करावे.
७. योजनेचे संनियंत्रण करणे.

**प्रकल्प संचालक, आत्मा**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची यादृच्छिक (Random) पद्धतीने किमान १% लाभार्थ्यांची तपासणी करावी व विहित नमुन्यातील पर्यवेक्षकीय तपासणी अहवाल सादर करावा.
३. उपविभागीय कृषि अधिकारी यांची मागणी व आवश्यकतेनुसार निधी उपलब्धतेबाबत संनियत्रण करणे.

## योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

१. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येईल.
२. या घटकास प्रकल्पाच्या संकेत स्थळावर, ग्रामसभा कार्यालयातील नोटीस बोर्ड, मेळावे इत्यादीद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.
३. तुती रोपांना सिंचना करिता नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत सूक्ष्म सिंचन या घटकांतर्गत ठिबक सिंचन या बाबीचा लाभ देय आहे.
४. तुती रोपाकरिता शासकीय रेशीम फार्म, कृषि विज्ञान केंद्र, कृषि विद्यापीठे, शासकीय रोपवाटीका, सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटीका इ. ठिकाणी रेशीम संचालनालयामधील जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या मदतीने तुती रोपे उपलब्धतेबाबत नियोजन करण्यात यावे. तसेच निवड झालेल्या लाभार्थ्यांना दर्जेदार रोपांची निर्मिती स्वतःच्या क्षेत्रावर तयार करण्याची मुभा देण्यात यावी.
५. तुती लागवडीचा कालावधी जून ते ऑक्टोबर अखेर पर्यंत राहील. या कालावधीत निश्चित केलेल्या क्षेत्रावर तुती लागवड होईल याची सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी दक्षता घ्यावी.

६. समूह स्वरुपात लागवड होईल अशा प्रकारे नियोजन करावे.
७. प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी गावसमूहातील गावसमूह सहाय्यक/संबधित कृषि सहाय्यक यांनी करून अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास या त्रुटींची संबंधित शेतकऱ्याकडून लगेच पूर्तता करून घ्यावी.

## खरेदी समितीने द्यावयाचे खरेदी प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, लाभार्थी श्री/श्रीमती________________________ मु.पो.______तालूका________जिल्हा________ यांनी रेशीम उद्योग या घटकांतर्गत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत या घटकासाठी विहित केलेल्या खरेदी समिती समक्ष मार्गदर्शक सूचनांना अनुसरून खरेदी केलेली आहे.

खरेदी केलेल्या रेशीम उद्योग साहित्याचा तपशिल -

| साहित्य तपशील | संख्या | किंमत रु. | खरेदीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| | | | |

**(स्वाक्षरी)**
**लाभार्थी**

**(स्वाक्षरी)**
**खरेदी समिती सचिव**
**(कृषि सहाय्यक)**

**(स्वाक्षरी)**
**उपस्थित खरेदी समिती सदस्य**

दिनांक-
ठिकाण- **(नाव )** **(नाव )** **(नाव )**

**(स्वाक्षरी)**
**रेशीम संचालनालयाचा प्रतिनिधी/ सदस्य**

**(स्वाक्षरी)**
**कृषि मित्र/ कृषि ताई**

**(नाव )** **(नाव )**

# पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी/ कर्मचारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं./गट न. _________<br>मु.पो. ____________________<br>ता. _________ उपविभाग __________<br>जि. ________ |
| ६. | बाब | रेशीम उद्योग |
| ७. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ८. | कामाचा कालावधी | |
| ९. | प्रत्यक्ष तुती लागवड क्षेत्र (हे.) | |
| १०. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | रेशीम उद्योग साहित्याचा तपशील-<br>दर संख्या एकूण किंमत अभिप्राय<br>१.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६. |
| ११. | देयकाची एकुण रक्कम (रु.) | होय/नाही |
| १२. | लाभार्थ्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १३. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | होय/नाही |
| १४. | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १५. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | होय/नाही |
| १६. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |

| | |
|---|---|
| | |
| १७. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
| | |

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी
(नाव....................)